## जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे

## निविदा सुचना सन २०१६-२०१७

जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचे अधिनस्त उपविभागीय अधिकारी यांचे आस्थापनेवरील तलाठी संवर्गातील भरती प्रक्रियेसाठी खालील नमूद ऑनलाईन संगणकीय कामासाठी नोंदणीकृत कंत्राटदारांकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे. निविदेचा अर्ज आणि अटी व शर्तीचा नमुना या जिल्हयाच्या संकेतस्थळावरुन (www.thane.nic.in) उपलब्ध करुन घेण्यात यावा. निविदा अर्जाचे शुल्क रक्कम रुपये १००/- स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा ठाणे कलेक्टोरेट कॅम्पस, ठाणे येथील चालू खाते क्रमांक ३२४६९६८५०७४ मध्ये रोख जमा करावे.

निविदा दिनांक ३०.७.२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील व शक्य झाल्यास त्याच दिवशी सायंकाळी ५.०० वाजता कंत्राटदारांसमोर अथवा त्यांच्या प्रतिनीधीसमोर उघडण्यात येतील. कंत्राटदारांना त्यांची निविदा मंजूर झाल्याचे कळविल्यापासून तीन दिवसांच्या मुदतीत आवश्यक ते करारपत्र (MOU) करुन द्यावे लागेल.

सशर्त निविदा स्वीकारली जाणार नाही. करारनामा लिहून दिल्यानंतर दिलेल्या मुदतीत काम पूर्ण करुन द्यावे लागेल. कोणतेही साहित्य किंवा यंत्रसामग्री या कार्यालयाकडून उपलब्ध करुन दिली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | शेरा |
|---|---|---|
| १ | उमेदवारांचे ऑनलाईन अर्ज इंटरनेटव्दारे संगणकावर भरणे, पात्र /अपात्र उमेदवारांची यादी तयार करुन प्रसिध्द करणे, पात्र उमेदवारांची ऑनलाईन प्रवेशपत्र(प्रवेशपत्रावर उमेदवाराची स्वाक्षरी व फोटो आवश्यक) निर्गमित करणे, परीक्षा केंद्रनिहाय हजेरीपट (उमेदवारांचा फोटो व स्वाक्षरीसह) तयार करणे, उत्तरपत्रिकांची विहित नमुन्यामध्ये छपाई करुन देणे, उत्तरपत्रिकांची (OMR) पध्दतीने तपासणी करुन प्राप्त गुणांची प्रवर्गनिहाय यादी तयार करुन देणे व त्यानुसार प्रवर्गनिहाय अंतिम निवड/प्रतिक्षायादी तयार करणे व इतर भरती प्रक्रियेशी संबंधित कामे मुदतीमध्ये करणे | निविदा दर प्रति अर्ज सर्व करांसह नमुद करावा. |

कंत्राटदाराकडे ऑनलाईन भरती प्रक्रियेचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. कंत्राटदाराला एका वेळी किमान १०,००० उमेदवारांच्या ऑनलाईन भरती प्रक्रियेचे काम योग्यरीत्या पूर्ण केल्याचा अनुभव असणे बंधनकारक आहे. अन्यथा निविदा तांत्रिक मुदयावर रद्द केली जाईल व वाणिज्य लाखोटा उघडण्यात येणार नाही.

स्कॅनर मशिनचा वेग (उत्तरपत्रिका स्कॅन करण्याचा वेग) किमान प्रति मिनीट २० इतका असणे आवश्यक आहे. निविदाधारकाचे किमान तीन संगणक संच व प्रिंटर्स हे सदर कामाची माहिती असणा-या संगणक ऑपरेटर्ससह असणे आवश्यक आहे. तसेच सदर ऑनलाइनचे कामासाठी इंटरनेटची सुविधा असणे आवश्यक आहे.

निविदा दोन माहोरबंद लखोटा पध्दतीने सादर करावयाच्या आहेत. मोहोरबंद लखोटयावर **"तलाठी पद भरतीसाठी ऑनलाइन संगणकीय काम करण्यासाठी निविदा"** असे लिहिणे आवश्यक आहे. लखोटा क्रमांक १ (तांत्रिक तपशिलाचा लखोटा) मध्ये नोंदणी प्रमाणपत्र (सन २०१६-१७ करिता वैध असलेले), आयकर प्रमाणपत्र (सन-२०१५-१६ या आर्थिक वर्षाचे ) तसेच निविदेमधील कामांचा अनुभव व साधनसामग्री असल्याबाबतची कागदपत्रे सादर करण्याची आहेत. लखोटा क्रमांक २ (निविदेचा लखोटा ) मध्ये दरांची निविदा सादर करण्याची आहे. लखोटा क्रमांक १ ची पूर्तता झाल्यानंतरच लखोटा क्रमांक २ उघडण्यात येईल.

कोणतीही निविदा अगर निविदेतील कोणताही भाग कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्याचा अथवा राखून ठेवण्याचा तसेच सुधारणा करण्याचा हक्क जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, ठाणे यांनी राखून ठेवला आहे, सदर निविदा तीन वर्षासाठी वैध राहील. निविदा सूचना सन २०१६-१७ या कार्यालयाच्या (www.thane.nic.in) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे

**सही/-**
**(डॉ.महेंद्र कल्याणकर)**
**जिल्हाधिकारी ठाणे तथा**
**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती ठाणे**

क्रमांक आस्थापना-१/तलाठी/निविदा/कावि-५०४७/२०१६
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
ठाणे दिनांक -२४/०७/२०१६ शिक्का

## जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे

## निविदा फॉर्म - तांत्रिक (लखोटा क्रमांक -०१)

१. निविदाकाराचे संपूर्ण नाव --------------------------------
आणि संपूर्ण पत्ता (मराठी/इंग्रजीमध्ये) --------------------------------

२. संस्था असल्यास प्राधिकृत इसमाचे नाव व --------------------------------
पत्ता आणि संपर्क दूरध्वनी क्रमांक/मोबाईल क्रमांक --------------------------------

३. संस्थेचा संपर्क दूरध्वनी क्रमांक/मोबाईल क्रमांक --------------------------------
--------------------------------

४. संस्था रजिस्ट्रेशन क्रमांक आणि --------------------------------
वैध कालावधी --------------------------------

५. ऑनलाईन निविदेमधील कामांचा अनुभव आहे काय? --------------------------------
५अ. असल्यास त्याबाबतचा संपूण तपशील द्यावा --------------------------------
आणि कामे समाधानकारक पूर्ण केल्याबाबतची --------------------------------
संबंधितांकडील प्रमाणपत्रे जोडावीत. --------------------------------

६. ओ.एम.आर. मशिन स्वत:चे आहे --------------------------------
अगर भाडयाने घेणार आहे काय? --------------------------------
६अ. भाडयाने घेणार असल्यास कोणाकडून --------------------------------
भाडयाने घेणार आहे त्याचा तपशील द्यावा व --------------------------------
त्यांचे रुपये १००/- च्या बॉंडपेपरवरील संमतीपत्र --------------------------------
निविदेसोबत जोडावे. --------------------------------

७. कामासाठी वापरण्यात येणा-या ओ.एम.आर. --------------------------------
मशिनचे स्पेसिफिकेशन नमूद करावे. --------------------------------

८. पॅन क्रमांक (प्रमाणपत्रांच्या सांक्षाकित प्रती जोडाव्यात.) --------------------------------

९. स्कॅनर मशिनचा वेग प्रती मिनिट किती आहे? --------------------------------

१०. निविदाधारकाचे संगणक संच व प्रिंन्टर्स किती --------------------------------
आहेत? व सदर कामाची माहिती असणारे --------------------------------
संगणक ऑपरेटर्स किती आहेत? --------------------------------

स्थळ :- निविदाकाराचे संपूर्ण नाव व सही

दिनांक :- (रबरस्टॅंम्प सह)

टिप : अ.क्र.४ ते ८ संबंधित प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती निविदेसोबत जोडाव्यात.

जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे

निविदा फॉर्म - वाणिज्य (लखोटा क्रमांक -०२)

| अ.क्र. | कामाचे नांव | दर रुपये (निविदा दर प्रती अर्ज सर्व करासह नमूद करावा.) |
|---|---|---|
| १ | उमेदवारांचे ऑनलाईन अर्ज इंटरनेटव्दारे संगणकावर भरणे, पात्र /अपात्र उमेदवारांची यादी तयार करुन प्रसिध्द करणे, पात्र उमेदवारांची ऑनलाईन प्रवेशपत्र (प्रवेशपत्रावर उमेदवाराची स्वाक्षरी व फोटो आवश्यक) निर्गमित करणे, परीक्षा केंद्रनिहाय हजेरीपट (उमेदवारांचा फोटो व स्वाक्षरीसह) तयार करणे, उत्तरपत्रिकांची विहित नमुन्यामध्ये छपाई करुन देणे, उत्तरपत्रिकांची (OMR) पध्दतीने तपासणी करुन प्राप्त गुणांची प्रवर्गनिहाय यादी तयार करुन देणे व त्यानुसार प्रवर्गनिहाय अंतिम निवड/प्रतिक्षायादी तयार करणे व इतर भरती प्रक्रियेशी संबंधित कामे मुदतीमध्ये करणे | |

स्थळ :-
दिनांक :-

निविदाकाराचे संपूर्ण नाव व सही
(रबरस्टँम्प सह)

# <u>जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे</u>

**पत्रव्यवहाराचा पत्ता :- उपविभागीय अधिकारी ठाणे विभाग ठाणे यांचे कार्यालय,**
**२१७, दुसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे कोर्ट नाका,**
**ठाणे (पश्चिम ठाणे) ४०० ६०१ दूरध्वनी क्र. : ०२२-२५३४५११०**
**ईमेल आयडी:- sdothane@gmail.com**

---

अटी व शर्ती

१. निविदा सीलबंद करुन सादर कराव्यात. निविदा दर सर्व करासह नमुद करणे आवश्यक आहे. निविदा अर्जाचे शुल्क रक्कम रुपये १००/- स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा ठाणे कलेक्टोरेट कॅम्पस, ठाणे येथील चालू खाते क्रमांक ३२४६९६८५०७४ मध्ये रोख जमा केल्याबाबतचे चलनाची मूळ प्रत सादर करणे बंधकनकारक आहे.

२. कंत्राटदाराकडे ऑनलाईन भरती प्रक्रियेचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. कंत्राटदारास आपल्या वतीने सदरचे काम दुसऱ्या व्यक्तीस/ संस्थेस देता येणार नाही वा एजंट नेमता येणार नाही.

३. निविदा मंजूर झालेल्या निविदाकारास रुपये २०,०००/- ( रुपये वीस हजार मात्र ) सुरक्षा अनामत रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत शाखा ठाणे येथील बँकेवर काढलेला आणि Sub Divisional Officer, Thane Division Thane यांचे नावे धनाकर्षाव्दारे (डिमांड ड्राफ्ट ) भरणा करावी लागेल.

४. काम करताना झालेल्या नुकसानीस संबंधित कंत्राटदार जबाबदार राहील. याबाबत कोणतीही नुकसान भरपाई देय राहणार नाही.

५. या कामाबाबत जिल्हाधिकारी, ठाणे तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, ठाणे यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

६. कामाचा ठेका मंजूर झाल्यानंतर व कार्यारंभ आदेश काढल्यानंतर निविदाकाराने काम नाकारल्यास अथवा गोपनीयतेचा भंग केल्यास अथवा काम अर्धवट अवस्थेमध्ये सोडून दिल्यास त्याचेविरुध्द फौजदारी/कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच झालेला खर्च सव्याज वसूल करण्यात येईल.

७. निविदेतील कामे जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे येथे नेमून दिलेल्या ठिकाणी करावयाचे आहे. गोपनीयतेच्या दृष्टीकोनातून या कामासाठी कंत्राटदाराकडून नियुक्त करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांची नावे व त्यांचे संपूर्ण पत्ते आगाऊ देणे बंधनकारक राहील.

८. तांत्रिक दोषांमुळे अथवा अन्य कोणत्याही कारणांमुळे काम बिनचुक व समाधानकारक न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

९. जिल्हाधिकारी ठाणे तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती ठाणे यांनी काम समाधानकारक असल्याचा दाखला दिल्यानंतर कंत्राटदारास देयकाची रक्कम अदा केली जाईल.

१०. निविदाकार व त्याचे कर्मचारी कोणत्याही राजकीय पक्षांशी संबंधित असता कामा नयेत.

११. कंत्राटदारास कोणत्याही प्रकारचे अग्रिम ( ॲडव्हान्स ) दिले जाणार नाही.

१२. कामाकरिता वापरण्यात येणारे ओ.एम.आर. मशिन आणि कागद उत्तम दर्जाचे तसेच मान्यताप्राप्त कंपनीचे असणे आवश्यक आहे.

१३. नेमून दिलेले काम मुदतीत पूर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा निविदाधारकाच्या देय रक्कमेतून ३० टक्के रक्कम वजा करण्यात येईल.

१४. जिल्हाधिकारी ठाणे तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती ठाणे यांना नियुक्त निविदाधारकाचे काम समाधानकारक वाटल्यास सदर निविदा पुढील तीन वर्ष वैध ठेवणेबाबतचा अंतिम निर्णय जिल्हाधिकारी ठाणे तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती ठाणे यांचा राहील.

१५. स्कॅनर मशिनचा उत्तरपत्रिका स्कॅन करण्याचा वेग प्रती मिनिट किमान २० इतका असणे आवश्यक आहे.

१६. निविदाधारकाचे किमान तीन संगणक संच व प्रिंटर्स हे सदर कामाची माहिती असणाऱ्या संगणक ऑपरेटर्ससह असणे आवश्यक आहेत. तसेच सदर ऑनलाईनचे कामासाठी इंटरनेटची सुविधा असणे आवश्यक आहे.

१७. उमेदवारांनी अर्ज कसा भरावा याबाबतची माहिती वेबसाईटवर देणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचणी आल्यास त्यासाठी संपर्क क्रमांक देणे आवश्यक राहील.

१८. उमेदवारांनी दाखल केलेले अर्ज अपात्र असल्यास ते कोणत्या कारणासाठी अपात्र आहेत. ते कारण स्पष्टपणे नमूद करुन उमेदवारांचे समाधान करणे आवश्यक आहे. उमेदवारांची पात्र /अपात्र यादी, त्यांचे प्रवेशपत्र वेळेत पोहोचणे व त्यांना कोणतीही अडचण राहणार नाही हे पाहण्यासाठी पुरेसे सक्षम कर्मचारी नेमूण त्याचे निराकारण करणेची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

१९. निविदाधारकाने ऑनलाईन व्दारे प्राप्त उमेदवारांच्या अर्जाची संख्या तसेच अन्य माहिती लेखी स्वरुपात दररोज उपविभागीय अधिकारी ठाणे विभाग ठाणे कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

२०. उमेदवारांची ऑनलाईन माहिती करप्ट न होणे, व्हायरसमुळे नष्ट न होणे, Data security आणि Data safety याबाबत निविदाधारकाने आपले स्तरावर उपाय योजना करणे आवश्यक आहे. तांत्रिक सदोषामुळे माहिती नष्ट झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकावर राहील. इंटरनेटव्दारे ऑनलाईन प्रक्रिया राबवत असताना Cyber security, Copyright, TRIPS, Patent, Software License बाबतची जबाबदारी निविदाधारकाची राहील. सदर बाबतीत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास निविदाधारक हे स्वत: जबाबदार राहतील. याबाबतीत जिल्हा निवड समिती कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

२१. निविदा मंजूर झालेल्या कंत्राटदाराने जिल्हाधिकारी ठाणे तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, ठाणे यांनी ठरवून दिलेल्या विहित नमुन्यात रुपये १००/- (रुपये शंभर मात्र ) इतक्या रकमेच्या स्टॅप पेपरवर करारनामा लिहून देणे बंधनकारक राहील.

२२. वरील कोणत्याही अटीचा भंग झाल्यास अथवा विहीत मुदतीत काम समाधानकारक व बिनचूक न झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन संबंधित कंत्राटदारवर

फौजदारी/कायदेशीर कारवाई करण्यात येईल. अशा परिस्थितीत कामाचे गांभीर्य ओळखून अन्य व्यक्ती /संस्थेकडून काम पूर्ण केले जाईल व त्याबाबतच्या देयकाची संपूर्ण रक्कम संबंधीत कंत्राटदाराकडून वसूल केली जाईल.

२३. निविदा दाखल केलेल्या कंत्राटदारास निविदेसंदर्भात न्यायालयीन दावा दाखल करावयाचा झाल्यास सदर दाव्याचे कार्यक्षेत्र ठाणे राहील.

२४. कोणत्याही अटीच्या अर्थाबद्दल किंवा इतर कोणत्याही बाबतीत विवाद उद्‌भवल्यास जिल्हाधिकारी, ठाणे तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, ठाणे यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

२५. सदरची निविदा अगर निविदेतील कोणताही भाग कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्याचा/राखून ठेवण्याचा तसेच सुधारणा करण्याचा हक्क जिल्हाधिकारी, ठाणे तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, ठाणे यांनी राखून ठेवला आहे.

२६. प्राप्त निविदा स्विकारणे, अथवा नामंजूर करणे, आवश्यक वाटल्यास काम विभागून देणे अथवा उपरोक्त अटी व शर्ती बदलण्याचा अथवा रद्द करण्याचा तसेच निविदेचा वैध कालावधी वाढविण्याचा अगर कमी करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी, ठाणे तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, ठाणे यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**(डॉ.महेंन्द्र कल्याणकर)**
**जिल्हाधिकारी ठाणे तथा**
**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती ठाणे**

वरील अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत.

स्थळ :- निविदाकाराचे संपूर्ण नाव व सही
दिनांक :- (रबरस्टँम्प सह)